अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र -: अतिमआ/H0/6033
दिनांक -: 0९/१0/२0१८

विषय : पुणे शहरातील -मृत पाण्यांची विल्हेवाटी संदर्भात घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

पुणे शहरातील मृत पाण्यांची विल्हेवाट इंन्सिनेरेटरमध्ये लावण्याच्या अनुषंगाने मा.अतिरिक्त आयुक्त (ज) यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीस खातील अधिकारी व संबंधित उपस्थित होते.

1	शीतल तेली-उगले	मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
2	श्री.सुरेश जगताप	सह महापालिका आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन)
3	श्री.श्रीनिवास कंदूल	मुख्य अभियंता (विद्युत)
4	डॉ.अंजली साबणे	सहाय्यक आरोग्य अधिकारी,
5	डॉवाघ.एन.पी.	व्हेटरनरी सुपरिटेंडेट

अ.क्र.	विषय	दिलेले आदेश	संबंधित जबाबदार अधिकारी
1	सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या कार्य कक्षेत मृत पावणाऱ्या पाण्यांच्या विल्हेवाटीबाबत.	सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या कार्यकक्षेत मृत पावणाऱ्या प्राण्यांच्या विल्हेवाटीसाठी करण्यात आलेल्या सुविधांची माहिती जाहिर प्रकटना द्वारे वर्तमान पत्रातून प्रसिद्ध करण्यात यावी.	सहाय्यक आरोग्य अधिकारी
2	गोठ्यामध्ये मृत पावणाऱ्या जनावरां बाबत.	गोठ्यामध्ये मृत पावणाऱ्या जनावरांच्या विल्हेवाटी संदर्भात सर्व गोठेधारकांना माहिती देण्यात यावी.	सहाय्यक आरोग्य अधिकारी
3	मृत पावणाऱ्या प्राण्यांच्या विल्हेवाटीसाठी दर निश्चित करण्या बाबत.	विद्युत खात्याकडून इंन्सिनेरेटरमध्ये पाळीव मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्या बाबत दर निश्चित करण्यात यावेत. (भटकी व मोकाट जनावरे सोडून)	सहाय्यक आरोग्य अधिकारी
4	मृत पावणाऱ्या प्राण्यांच्या विल्हेवाटी संदर्भात हेल्पलाईन तयार करणेबाबत.	मृत पावणाऱ्या प्राण्यांच्या विल्हेवाटी संदर्भात नागरिकांना तक्रारी अथवा माहिती प्राप्त होण्यासाठी पूर्वीप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील ९६८९९३१९०३ हा दुरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात यावा.	सह महापालिका आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन)

Scanned by CamScanner

5	पुणे शहरातील भटकी व मोकाट मृत प्राण्यांची वाहतूक इंन्सिनेरेटर पर्यंत करण्याबाबत.	मृत प्राण्यांच्या विल्हेवाटीसाठी नायडू हॉस्पिटल नजीक उभारण्यात आलेल्या इंन्सिनेरेटर पर्यंत मृत प्राण्यांची वाहतूक घनकचरा व्यवस्थापन विभागातील सेवकांमार्फत व वाहनांमार्फत करण्यात यावी व व्हेईकल देपोमार्फत मृत प्राणी वाहतूक करण्यासाठी वाहन उपलब्ध करून द्यावे.	१. सह महापालिका आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) २. उपायुक्त परिमंडळ (१ ते ५) ३. अधीक्षक अभियंता (व्हेईकल डेपो) ४. महापालिका सहाय्यक आयुक्त (सर्व क्षेत्रिय कार्यालय) ५. विभागीय वैद्यकीय अधिकारी (परिमंडळ १ ते ५) ६. सर्व विभागीय आरोग्य निरीक्षक ७. सर्व आरोग्य निरीक्षक
6	मृत प्राण्यांचा इंन्सिनेरेटर २४x७ कार्यान्वित ठेवणेबाबत.	मृत प्राण्यांचा इंन्सिनेरेटर २४x७ कार्यान्वित ठेवणेत यावा व त्यावर महापालिका सहाय्यक आयुक्त,ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालयाकडील सबंधित आरोग्य निरीक्षक यांनी कामकाजावर नियत्रंण ठेवावे.	मुख्य अभियंता (विद्युत) कार्यकारी अभियंता (विद्युत) महापालिका सहाय्यक आयुक्त (ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय)

उपरोक्त प्रमाणे सूचना देउन बैठक संपन्न झाली.

शीतल तेली - उगले
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत-

1. मा.महापालिका आयुक्त
   यांजकडेस माहितीसाठी सादर .....
2. सर्व सबंधित अधिकारी
   यांजकडेस पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.....

Scanned by CamScanner